महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादीत
एस्ट्रेला बॅटरीज एक्सपॅन्शन इमारत,तळमजला,लेबर कॅम्प,
धारावी रोड, माटुंगा (पुर्व) मुंबई -४०० ०१९
दुरध्वनी क्र. ०२२-६९४२५००
ई-मेल -agmhrc@mahagenco.in वेबसाईट :- www.mahagenco.in

क्र.महानिर्मिती/उपमव्य.(मासं-सेप्र)/ No 03138 दिनांक: 13 APR 2026

# सूचना

**विषय:** जाहिरात क्र.०३/२०२५ अन्वये उप वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) व उप व्यवस्थापक (सुरक्षा) या पदांच्या वैयक्तिक मुलाखत परीक्षेअंती अंतिम निवड / प्रतिक्षा यादी व ऑनलाईन परीक्षेतील गुण.

**संदर्भ:-** १) महानिर्मिती जाहिरात क्र.०३/२०२५
२) कार्यालयीन आदेश क्र.९८५१ दि.०७.११.२०२५
३) महानिर्मिती सूचना क्र.९९७४ दि.११.११.२०२५
४) महानिर्मिती सूचना क्र.२४४७ दि.१८.०३.२०२६

उपरोक्त विषयास अनुसरुन, महानिर्मिती जाहिरात क्र.०३/२०२५ अन्वये उप वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) व उप व्यवस्थापक (सुरक्षा) या पदांकरीता सरळसेवा जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदरील पदांची ऑनलाईन परीक्षा दि.०५.०७.२०२५ रोजी घेण्यात आली होती. वरील ऑनलाईन परीक्षेत प्राप्त गुणांच्या अनुषंगाने व जाहिरात केलेल्या पदानुसार, उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी, ती जमा करण्याकरिता दि.२५.०८.२०२५ रोजी बोलविण्यात आले होते. कागदपत्रे पडताळणीअंती पात्र ठरलेल्या उमेदवारांची वैयक्तिक मुलाखत परीक्षा संदर्भिय क्र.०४ वरील सूचनेनुसार पार पाडण्यात आली आहे.

उप वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) व उप व्यवस्थापक (सुरक्षा) या पदांच्या ऑनलाईन परीक्षेतील गुण आणि वैयक्तिक मुलाखत परीक्षेतील गुण एकत्रित करुन जाहिरातीत नमूद सामाजिक व समांतर आरक्षणातर्गत रिक्त पदांच्या अनुषंगाने अंतिम निकाल घोषित करण्यात येत आहे. उप वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) व उप व्यवस्थापक (सुरक्षा) या पदांच्या ऑनलाईन परीक्षेतील गुण व अंतिम निवड / प्रतिक्षा यादी प्राप्त करुन घेण्याकरीता उमेदवारांनी खालील ठिकाणी क्लिक ↵ करावे.

**उप वरिष्ठ व्यवंस्थापक (सुरक्षा) या पदाचे ऑनलाईन परीक्षेतील गुण.** ↵

**उप वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) या पदाची अंतिम निवड / प्रतिक्षा यादी.** ↵

**उप व्यवस्थापक (सुरक्षा) या पदाचे ऑनलाईन परीक्षेतील गुण.** ↵

**उप व्यवस्थापक (सुरक्षा) या पदाची अंतिम निवड / प्रतिक्षा यादी.** ↵

**टिप:-**

१) कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेकरीता मागास प्रवर्गातून बोलविण्यात आलेल्या उमेदवारांना वैयक्तिक मुलाखतीअंती प्राप्त एकुण गुणांनुसार (ऑनलाईन परीक्षा गुण ७०%+ वैयक्तिक मुलाखत गुण ३०%) त्यांची निवड खुल्या प्रवर्गातून होऊ शकते. तसेच खुल्या प्रवर्गातून कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेकरीता बोलविण्यात आलेल्या उमेदवारांची निवड वैयक्तिक मुलाखतीअंती त्यांना प्राप्त एकुण गुणांनुसार (ऑनलाईन परीक्षा गुण ७०% + वैयक्तिक मुलाखत गुण ३०%) संबंधीत उमेदवाराने अर्ज केलेल्या मुळ प्रवर्गातूनसुध्दा होऊ शकते, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२) उप वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) व उप व्यवस्थापक (सुरक्षा) या पदांची अंतिम निवड / प्रतिक्षा यादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधनाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करण्याचा अधिकार महानिर्मिती कंपनीने राखून ठेवलेला आहे.

३) वरील पदाकरीता प्रतिक्षा यादी ही सूचना प्रसारित केल्यापासून ०१ वर्षापर्यंत वैध असेल. तसेच सदरील प्रतिक्षा यादी कार्यान्वीत करण्याबाबतचे अधिकार हे महानिर्मिती कंपनी राखून ठेवत आहे.

(डॉ.नितीन वाघ)
कार्यकारी संचालक (मासं)